# शेळ्या, मेंढ्यांच्या आजारावर उपाययोजना

डॉ. रवींद्र निमसे, डॉ. समीर ढगे

**पावसाळा हा शेळ्या, मेंढ्यांच्या आरोग्यासाठी एक संवेदनशील कालावधी असतो. या काळात वातावरणातील आर्द्रता, थंडी-उष्णतेतील बदल, ओलसर परिस्थितीमुळे विविध संसर्गजन्य व परजीवी आजारांचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढतो. योग्य आरोग्य व्यवस्थापन तसेच नियमित लसीकरण आवश्यक आहे.**



शेळ्यांचे आरोग्य आणि आहार व्यवस्थापनाकडे लक्ष द्यावे.

## घटसर्प

- जिवाणूमुळे होणारा अत्यंत घातक व वेगाने पसरणारा आजार आहे. विशेषतः भरपूर पोषण किंवा पचन बिघडल्यावर याचा उद्रेक होतो. वेळीच लस दिली नाही, तर शेळ्या, मेंढ्यांमध्ये मृत्युदर अत्यंत जास्त असतो.
- जास्त वयाच्या मेंढीपेक्षा कमी वयाच्या कोकरांमध्ये हा आजार होण्याची शक्यता अधिक असते.

## पीपीआर

- संसर्गजन्य विषाणूजन्य आजार आहे. यामध्ये ताप येणे, डोळे व नाक वाहणे, तोंडात जखमा, अतिसार आणि मृत्यू होतो.
- विशेषतः ६ महिन्यांपासून पुढील वयातील शेळ्यांमध्ये याचा धोका अधिक असतो. ही लस तीन वर्षांतून एकदा द्यावी.

## लाळ्या खुरकूत

- एक विषाणूजन्य आजार आहे. तोंड, जीभ, खुरांवर फोड येतात, त्यामुळे खाणे-पिणे बंद होते. दूध उत्पादन कमी होते. शारीरिक वाढीवर याचा थेट परिणाम होतो.

## बाह्य परजीवीमुळे होणारे आजार

आर्द्रतेमुळे त्वचेवर बुरशी आणि बाह्यपरजीवींचा प्रादुर्भाव होतो. त्यामुळे त्वचा खाजवणे, केस गळणे, जखमा होणे अशी लक्षणे दिसतात.

**उपाय**
- पशुतज्ज्ञांच्या सल्ल्याने औषधोपचार करावेत. गोठ्यातील भिंती, कोपरे इत्यादी निर्जंतुक ठेवावेत.

**जंत**
- पोटात असणारे गोल, चपटे किंवा हुकवर्म प्रकारचे जंत यामुळे अशक्तपणा व वाढ खुंटणे अशी लक्षणे दिसतात. हे अंतर परजीवी पावसाळ्यात गवतावर अंडी घालतात, त्यांच्या अळ्या सक्रिय होतात.

**उपाय**
- दर सहा महिन्यांनी जंतनाशक शिफारशीत प्रमाणात द्यावे.
- पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळ्यानंतर ही प्रक्रिया करणे उपयुक्त ठरते.

## लसीकरणाचे वेळापत्रक

**पीपीआर**
- ३ ते ६ महिन्यांचे वय झाल्यावर एकदा लस द्यावी. त्यानंतर दर ३ वर्षांनी बूस्टर डोस द्यावा.

**पोटफुगी**
- दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला (मे-जूनमध्ये) लस द्यावी.

**लाळ्या खुरकूत**
- दर ६ महिन्यांनी (जानेवारी आणि जुलै) लस द्यावी.

**घटसर्प**
- जर मेंढ्या पाणथळ भागात असतील, तर वर्षातून एकदा ही लस द्यावी.

## नैसर्गिक रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी उपाय

**लिंबाचा डहाळा**
- शेळ्या, मेंढ्यांना आठवड्यातून किमान एकदा तरी लिंबाच्या पाल्याचा डहाळा खावू घालावा. जेणेकरून आंतरपरजीवी कमी होण्यास मदत होते, पचनक्रिया सुधारते.

**लसूण**
- आहारात थोड्या प्रमाणात ठेचलेला लसूण वापरावा. यामुळे आतड्यांतील जंत कमी होतात. शरीरातील रोगप्रतिकारशक्ती वाढते.

**संमिश्र आहार**
- प्रथिनयुक्त, खनिजयुक्त आणि जीवनसत्त्वयुक्त आहार देणे रोगप्रतिकारशक्तीस पोषक ठरते.

**मिठाचे पाणी**
- आठवड्यातून एकदा खारट पाणी दिल्यास पचनक्रिया सुधारते. अंतर्गत कृमीवर काही प्रमाणात नैसर्गिक नियंत्रण मिळते.

**इतर खबरदारी**
- आजारी जनावरे विलगीकरण करून इतरांपासून वेगळी ठेवावीत.
- कोणतेही नवीन जनावर कळपात आणल्यास लसीकरण व निरीक्षणानंतरच कळपात मिसळावे.
- खुरांची कापणी, त्वचेची तपासणी आणि केसांची स्वच्छता नियमित करावी.

## पायांचे सामान्य विकार

**लंगडी**
- ही एक जिवाणूजन्य विकृती आहे. चिखल आणि ओलसर जमिनीवर चालल्यामुळे जनावरांच्या खुरांमध्ये जंतुसंसर्ग होतो. त्यामुळे शेळ्या-मेंढ्या लंगडतात. योग्य स्वच्छता, खुरांची कापणी व निर्जंतुकीकरण करणे आवश्यक आहे.

**पायांमध्ये सड**
- चिखल आणि जंतुसंसर्गामुळे खुरांमध्ये सूज, सडणे आणि दुर्गंधीयुक्त स्राव येतो. आजार गंभीर झाल्यास जनावरे हालचाल करणे थांबवतात, खणेपिणे कमी अथवा बंद होते.
- काही परिस्थितीमध्ये जनावरे दगावण्याची शक्यता असते.

**जंत, बुरशी संसर्ग**
- पायांच्या फटीत, खुरांच्या तळाशी कीटकांची अंडी व अळ्या वाढू लागतात. बुरशीमुळे त्वचेला खाज सुटते, सोलटते, सूज येते आणि जखम चिघळते.

## साप्ताहिक पाय धुण्याची प्रक्रिया

पावसाळ्यात आठवड्यातून एकदा पाय संक्रमक द्रावणामध्ये बुडवून स्वच्छ करणे आवश्यक आहे.

**सोडिअम हायपोक्लोराइट**
- एक टक्का द्रावण हे एक शक्तिशाली जिवाणूनाशक आहे. यामुळे खुरांवर असणारे जिवाणू, विषाणू आणि बुरशी नष्ट होतात.

**वापर**
- १० लिटर पाण्यात सुमारे १०० मिलि सोडिअम हायपोक्लोराइट मिसळावे.
- सर्व जनावरे या द्रावणातून चालवावीत किंवा त्यांचे पाय द्रावणात बुडवावे. द्रावणात २ ते ३ मिनिटे राहू द्यावे. नंतर कोरड्या जमिनीवर उभे करावे.

**पोटॅशिअम परमँगनेट**
- जखमांवर उपचार करणारे, बुरशी नियंत्रणासाठी प्रभावी ठरते.

**वापर**
- १० लिटर पाण्यात १ ग्रॅम पोटॅशिअम परमँगनेट पावडर मिसळून फिकट जांभळे द्रावण तयार करावे.यामध्ये जनावरांचे पाय काही वेळ बुडवावेत.
- हे द्रावण फोड, खरूज आणि पायातील घाण साफ करण्यास उपयुक्त ठरते.

## पाय स्वच्छतेसाठी नियमित पद्धती

- दररोज खुरांची तपासणी करावी.
- खुरांवर चिखल साचलेला असल्यास तो लगेच पाण्याने धुऊन घ्यावा.
- खुरांची वाढ वाकडी, अनियमित झाली असल्यास दर ४ ते ६ आठवड्यांनी ती व्यवस्थित कापून आकारात आणावी.
- खूर साळणी करताना सिमेंटच्या चपट्या पृष्ठभागाचा वापर करावा किंवा शिस्तबद्ध खूर-कापणी यंत्राचा वापर करावा.
- पाय स्वच्छ करून लगेचच ओलसर जागेत परत नेल्यास स्वच्छतेचा फायदा होत नाही. त्यामुळे पाय धुतल्यावर जनावरांना काही वेळ वाळू, भुसा किंवा सुकवलेल्या गवताच्या थरावर उभे ठेवावे.

## प्रतिबंधक उपाय

- खुरांची जखम लक्षात आल्यास त्यावर लगेच मलम लावावे.
- जखम गंभीर असल्यास पशुवैद्यकाचा सल्ला घ्यावा.
- बाधित जनावरांपासून इतर जनावरे वेगळी ठेवावीत.
- खुरांची मजबुती व पुनरुत्पत्ती साठी बायोटिन, झिंक आणि कॅल्शिअम युक्त खनिज मिश्रण शेळ्या मेंढ्यांच्या आहारात नियमित असणे आवश्यक आहे.

## निरीक्षण

- शेळी, मेंढी पालनात यशस्वी उत्पादनासाठी दररोज जनावरांचे बारकाईने निरीक्षण करणे हा सर्वांत महत्त्वाचा व आधारभूत भाग असतो. विशेषतः पावसाळ्यासारख्या संवेदनशील हंगामात वातावरणातील बदल, चारा-पाण्याची गुणवत्ता आणि संसर्गजन्य आजारांचा धोका अधिक असल्यामुळे दररोजची आरोग्य तपासणी व हालचालींचे निरीक्षण आवश्यक ठरते.
- जनावर जेव्हा चारा कमी खाते, निवडक खाते, पाणी न पिता फक्त उभे राहते, तेव्हा हे आरोग्य बिघडल्याचे प्राथमिक लक्षण आहे.
- पचनक्रिया बिघडल्यास चाऱ्याचा वापर अचानक कमी होतो.
- सामान्यतः शेळ्या, मेंढ्या सक्रिय असतात, पण जर ते सुस्त, जास्त वेळ बसून राहणे किंवा जमिनीवर डोके टेकवून बसणे अशी लक्षण दाखवत असेल, तर आजारी असण्याची दाट शक्यता असते.
- जर जनावरास हळूवार हात लावल्यास शरीर जास्त गरम वाटले, तर त्याला ताप आलेला असण्याची शक्यता आहे.
- डोळे लालसर होणे, नाकातून स्राव किंवा श्वसनात अडथळा यासारखी लक्षणे तापासोबत दिसतात.
- पावसाळ्यात लंगडी, खुरांमध्ये फोड, सूज किंवा सड झाल्यास जनावर लंगडते किंवा उठत नाही. दररोज चालण्यावर लक्ष ठेवल्यास ही स्थिती लगेच ओळखता येते.
- खरूज, डाग, बुरशीजन्य संसर्ग यामुळे त्वचेवर चट्टे येतात.खाजवणे, त्वचा सोलवटणे, रक्त येणे यासारखी चिन्हे/लक्षणे आढळल्यास त्वचारोगाची सुरुवात झालेली असते.
- अतिसार असल्यास पातळ विष्ठा, काळसर किंवा पिवळसर रंग किंवा रक्त मिसळलेली विष्ठा दिसते.
- लघवीत रंग बदल, घटसर्पासारख्या आजारांचे द्योतक असू शकतात.
- प्रत्येक जनावराच्या हालचाली लक्षात ठेवण्यासाठी नोंदवही वापरावी.
- तापमापक, नाक-डोळे पुसण्यासाठी स्वच्छ कापड व आवश्यक प्रथमोपचारासाठी औषधे जवळ असावीत.
- एकाच वेळी सर्व जनावरांची तपासणी करण्यापेक्षा त्यांच्या वयोगटानुसार निरीक्षण करून विभागणी करावी.

- डॉ. रवींद्र निमसे ९४२२१७९५२५
(पशु वैद्यकीय अधिकारी, पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, पदव्युतर महाविद्यालय, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)
- डॉ. समीर ढगे ९४२३८६३५९६
(विभाग प्रमुख, पशु संवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, पदव्युतर महाविद्यालय, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)